


वाचनाने मानवी संस्कृती समृद्ध होते.

प्राचार्य डॉ.चंद्रशेखर राख

गंगाखेड आज दि.03/01/2025 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंडे महाविद्यालय व अध्यापक महाविद्यालय गंगाखेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र शासनाच्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अभियानांतर्गत वाचन संकल्प हा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉक्टर चंद्रशेखर राख होते. या कार्यक्रमाचे संयोजक कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक डॉक्टर अशोक केंद्रे कार्यक्रमाच्या सुरूवातीला सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली प्रस्ताविक पर मनोगत व्यक्त करणाताना वाचनाचे महत्त्व, मूल्य व महाराष्ट्र शासनाचा वाचन संकल्प यावर प्रकाश टाकला.

प्रमुख पाहुणे चंद्रशेखर राख आपले मनोगत व्यक्त करत असताना वाचन हे मानवी आरोग्यासाठी किती महत्त्वाचे आहे. आपले वाचन चालू राहिले तर आपण वाचाल अन्यथा आपली अवस्था जिवंत असूनही मेल्यासारखी असेल, मानवी अस्तित्व संपुष्टात येईल. जर समाजात चैतन्य निर्माण करायचे असेल समाजातील प्रत्येक घटकांनी दररोज वाचन केले पाहिजे

या कार्यक्रमाच्या शेवटी प्राध्यापक डॉक्टर रेखा बने यांनी वाचन संस्कृती बरोबरच सावित्रीबाई फुले जीवन चरित्रावर अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक डॉक्टर किरण पिनाटे मॅडम यांनी केले. यावेळी डॉक्टर सुभाष यादव, डॉ.राजीव आहेरकर, डॉक्टर बबन गीते, प्राध्यापक नामदेव लटपटे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







OPPO Reno11 5G
3 January 2025 at 13:06


राष्ट्रीय सेवा योजना
OPPO Reno11 5G
3 January 2025 at 13:19